पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/७३०/२०१४
दिनांक : २८/०९/२०१४

प्रति,

मा......................................
सदस्य, शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा दिनांक **०३/०९/२०१४** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **०३/०९/२०१४** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.शहर सुधारणा समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - ०४**

दिनांक : **०३/०९/२०१४** वेळ : दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **०३/०९/२०१४** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

दिनांक **२०/०८/२०१४** रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमाक ३)** सभावृत्तांत कायम करणे.

----------

**विषय क्र.१)** आकुर्डी येथील पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या मंजूर योजने नुसार आकुर्डी येथील सर्वे नं.३५/३/१ पैकी सुमारे ५० आर क्षेत्र आरक्षण क्र.५४८ नुसार प्राथमिक शाळेसाठी आरक्षित ठेवण्यात आलेले आहे. सदरचे आरक्षण पिंपरी चिंचवड मनपा नियंत्रण क्षेत्रात येत आहे. या आरक्षणासाठी पोहच रस्ता ९ मीटर रुंदीचा आहे. हा ९ मीटर रुंदीचा रस्ता शाळेसाठी अरुंद असून अपुरा आहे. तसेच या आरक्षणामध्ये रहिवासी घरे, चर्च असून सुमारे ८० टक्के क्षेत्र इमारतीने व्यापलेले आहे. या शाळेच्या लगतच्या परिसरामध्ये सेंट उर्सुला हायस्कूल, ट्रिनिटी विद्यालय, सरस्वती विद्यालय, म्हाळसाकांत विद्यालय तसेच पिं.चिं.मनपाचे आकुर्डी शाळा आहे. तरी या आरक्षणानुसार आता शाळेची आवश्यकता नाही. वरील सर्व बाबींचा विचार करता सदरचे आरक्षण क्र.५४८ नुसार शाळेसाठी आरक्षित जागा आरक्षणामधून वगळून रहिवासी निवासी विभागात समाविष्ठ करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करुन सदरचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करणेस मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

( दिनांक ०३/०९/२०१४ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

**विषय क्र.२)** मा.अ प्रभाग समिती ठराव क्रमांक २२० दिनांक ०८/०१/२०१४ नुसार पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने सन १९९५ च्या विकास आराखडयानुसार आकुर्डी येथील स.नं.३५/३/१ पैकी सुमारे ५० आर क्षेत्र आरक्षण क्र.५४८ नुसार प्राथमिक शाळेसाठी आरक्षित ठेवण्यात आले आहे. सदर आरक्षण पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नियंत्रणामध्ये सन १९९७ पासून आलेले आहे. सदर आरक्षणामध्ये काही १९९५ व १९९७ पुर्वीची जुनी बांधकामे होती व नंतरच्या काळात देखील काही बांधकामे झालेली आहेत. या आरक्षणामध्ये १८ गुंठे जागा रिकामी असून इतर जागेत अनाधिकृत बांधकामे आहेत. १८ गुंठे रिकाम्या जागेचे भूसंपादन प्रक्रीया सुरु करणेस व ज्या जागेमध्ये बांधकामे झालेली आहेत ती जागा आरक्षणामधून वगळणेस मान्यता घेणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
( दिनांक ०३/०९/२०१४ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

**विषय क्र.३)** मा.अ प्रभाग समिती ठराव क्रमांक २५ दिनांक १०/०७/२०१४ नुसार प्रभाग क्र.१५ दत्तवाडी मधील क्रांतीनगर भागात मस्जिदसमोर असणा-या आरक्षण क्र.५४७ ची जागा भूसंपादित करुन त्या ठिकाणी महापालिकेची योजना राबविणेस मान्यता घेणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.४)** मा.अ प्रभाग समिती ठराव क्रमांक २८ दिनांक १०/०७/२०१४ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१९ किवळे येथील सर्व्हे नं.९२ येथे स्मशानभूमीकडे जाणा-या १२ मी.रस्त्याचे आरक्षण प्रस्तावित केले आहे. या आरक्षणामुळे येथील कायम स्वरुपी रहिवाशी असलेल्या लोकांची घरे बाधीत होणार आहेत. महापालिकेने यापूर्वी जाहिर केलेल्या प्रारुप आराखडयामध्ये हा १२ मी. रस्ता सर्व्हे नं.९१ मध्ये होता. सर्व्हे नं.९१ मध्ये कोणतेही घर नाही व नंतर पालिकेने विकास आराखडयात हा रस्ता सर्व्हे नं.९१ व ९२ च्या सिमेवरुन टाकणेत आला आहे. त्यामुळे सर्व्हे नं.९२ ची घरे व शेतक-यांवर अन्याय होत आहे. त्यामुळे हा रस्ता महानगरपालिका नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करुन पूर्वीच्या सर्व्हे नं.९१ मधील मोकळया जागेमध्ये स्थलांतरीत करणेस तसेच सर्व्हे नं.८२ किवळे १८ मी. रस्त्याचे आरक्षण आहे. त्यामुळे

एका शेतक-यावर अन्याय होत आहे. त्यामुळे तो रस्ता सर्व्हे नं.८१ व ८२ मध्ये समांतर टाकणेबाबत पुढील कार्यवाही करणेस मान्यता घेणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/७३०/२०१४
दिनांक : २८/०८/२०१४ चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.